# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Liquor**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **04/09/2022**

**Brief of the work done :-**

बनावट विदेशी दारू कारखान्यावर पोलिसांचा छापा, पितापुत्राला अटक ; साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त.

पुण्य नगरी

## बनावट विदेशी दारु कारखान्यावर छापा

### पितापुत्राला अटक; साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

**वाशीम**, दि. ३ (प्रतिनिधी)

**शहरातील हिंगोली मार्गावरील पंचाळा फाट्याजवळ असलेल्या वाईनबारवर छापा मारुन पोलिसांनी बनावट देशी, विदेशी दारु व दारु बनविण्याचे साहित्य असा ४ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २ सप्टेंबरच्या रात्री करण्यात आली असून वाईनबार मालक प्रभाकर महादु वानखडे व आयुष प्रभाकर वानखडे दोन्ही रा. संतोषीमाता नगर या पितापुत्राला अटक केली. बनावट विदेशी दारु कारखान्यावर छापा मारल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली असून मद्यपींमध्ये भीतीचे वातावरण आहे.**



अधिक माहितीनुसार, शहरपासून जवळच असलेल्या हिंगोली मार्गावरील पंचाळ फाट्यानजीक आयुष वाईनबारमध्ये बनावट देशी, विदेशी दारु बनविल्या जात असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने उत्पादन शुल्क वाशीमचे पथक सोबत घेवून या वाईनबार शुक्रवारी रात्री छापा मारला असता तेथे ६३ हजार ९३५ रुपयांची वेगवेगळ्या कंपनीच्या ब्रांडची विदेशी दारू, ३ हजार ३६० रुपयांची देशी दारू, ३हजार ५०० रुपयांची हलक्या दर्जाची विदेशी दारु, एक हजार रुपये किंमतीचे स्पीरीट, दारु बनविण्याकरीता उपयोगात येणारे १ हजार ६६० रुपयांचे झाकन, असा एकूण ४ लाख ४३ हजार ५७९ रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. सदर मुद्देमाल पंचासमक्ष पोलिसांनी जप्त केला असून वाईनबार मालक पितापुत्राला अटक केली. याप्रकरणी वाशीम ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये भादंवि कलम ३२८,२७३, १८८, ३४ तसेच सहकलम ६५ इ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाथ पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, एपीआय अतुल मोहनकर, पीएसआय शब्बीर पठाण, किशोर चिंचोळकर, सुनील पवार, राजेश राठोड, डिगांबर मोरे, शेखर घोडे, विशाल मोहळे या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक गोपीनाथ पाटील, दुय्यम निरीक्षक किरण बगडे, रंजित आडे, नितीन तिडके, ललित खाडे, स्वप्नील लांडे या पथकाने केली.

### बनावट दारुची मद्यपींनी घेतली धास्ती

दारुच्या आहारी गेल्याने अनेक कुटुंब उध्दस्त झाली. तसचे राज्यात अनेक ठिकाणी बनावट दारु प्राषण केल्याने मद्यपींना जीव गमवावा लागल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. त्यामुळे वाशीम सारख्या लहान जिल्ह्यात बनावट विदेशी दारु बनवून ती बाजारात विक्री केल्या जात असल्याची बाब पोलिसांच्या कारवाईने उजागर झाली. त्यामुळे मद्यपींमध्ये भीतीचे वातावरण असून या घटनेमुळे जिल्हाभरात खळबळ उडाली आहे.